Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 49

185

8

# नगर परिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

**एस. एन. सातव**
समाजशास्त्र विभाग,
नागनाथ महाविद्यालय,
औंढा नागनाथ, जि. हिंगोली

**डॉ. रामचंद्र भिसे**
संशोधक मार्गदर्शक,
बिंदुमाधव महाविद्यालय,
भोकर, जि. नांदेड

## Research Paper - Sociology

**प्रस्तावना**

नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती व त्यांच्या समस्यांशी निगडित अनेक चल घटक (Variables) जबाबदार आहेत. नगरपरिषदेतील चतुर्थ कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थिती व त्याविषयीच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने सर्वप्रथम या समस्यांची विभागणी खालील दोन गटांत केली आहे.

१. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती

२. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक समस्या

याची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

**नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती :-**

नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करत असताना या कर्मचाऱ्यांना येत असलेल्या समस्या जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. त्या अनुषंगाने संशोधकाने प्रश्नावलीद्वारे प्रतिसादक कर्मचाऱ्यांना प्रश्न विचारून त्यांच्या व्यक्तिगत समस्यांच्या तीव्रतेबाबत विचारले असताना प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी नोंदविलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण प्रस्तुत परिच्छेदात करण्यात आले आहे.

**नगरपरिषदेतील पदनामानुसार वर्गीकरण**

नगरपरिषदेतील कर्मचारी ज्या पदावर काम करतो त्यास पदनाम असे म्हणतात, ड्रायव्हर, शिपाई, तांत्रिक, कंपाउंडर असे विविध पदनाम आहेत. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात तो कर्मचारी नगरपरिषदेतील कोणत्या पदावर काम करतो ही बाब अभ्यासणे अत्यंत महत्त्वाची ठरते. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 50

नगरपरिषदेतील पदनामानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. १**

**नगरपरिषदेतील पदनामानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिपाइं | १३ | २०.०० | १२ | १९.०९ | ११ | १७.५० | ३७ | १९.०३ |
| २. | ड्रायव्हर | ६ | ९.१७ | ६ | ९.०९ | ७ | १०.०० | १८ | ९.३५ |
| ३. | कामगार | २८ | ४२.५० | ३१ | ४७.२७ | २८ | ४२.५० | ८६ | ४४.१९ |
| ४. | तांत्रिक | ८ | १२.५० | ९ | १४.५५ | ५ | ७.५० | २३ | ११.९४ |
| ५. | कंपाऊंडर | २ | २.५० | २ | २.७३ | २ | २.५० | ५ | २.५८ |
| ६. | ऑपरेटर | ७ | १०.८३ | ४ | ५.४५ | ३ | ५.०० | १४ | ७.४२ |
| ७. | पट्टेवाला | २ | २.५० | १ | १.८२ | १० | १५.०० | ११ | ५.४८ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १३ (२०%) प्रतिसादक कर्मचारी शिपाई पदावर कार्यरत आहेत, ६ (९.१७%) प्रतिसादक कर्मचारी ड्रायव्हर पदावर कार्यरत आहेत, २८ (४२.५०%) प्रतिसादक कर्मचारी कामगार पदावर कार्यरत आहेत, ८ (१२.५०%) प्रतिसादक कर्मचारी तांत्रिक पदावर कार्यरत आहेत, २ (२.५०%) प्रतिसादक कर्मचारी कंपाउंडर पदावर कार्यरत आहेत, ७ (१०.८३%) प्रतिसादक कर्मचारी ऑपरेटर पदावर कार्यरत आहेत आणि २ (२.५०%) प्रतिसादक कर्मचारी पट्टेवाला पदावर कार्यरत आहेत.

**स्थावर मालमत्तेच्या मूल्यानुसार वर्गीकरण**

स्थावर मालमत्ता म्हणजे घर, दुकान, शेत, प्लॉट इत्यादी प्रकारच्या मालमत्ता. स्थावर संपत्तीच्या मूल्यावरून व्यक्तीची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कशी आहे याचा अंदाज काढता येतो. स्थावर संपत्तीचे मूल्य जितके अधिक तितकी त्या व्यक्तीची आर्थिक व सामाजिक स्थिती मजबूत आहे असे म्हणता येऊ शकते. तथापि नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 51

सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्याच्या स्थावर संपत्तीच्या मूल्याचा अभ्यास अत्यंत महत्त्वाची ठरते. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे स्थावर संपत्तीचे मूल्यानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. २**

**स्थावर संपत्तीच्या मूल्यानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ लाखपर्यंत | ९ | १३.३३ | ८ | १२.७३ | ७ | १०.०० | २४ | १२.२६ |
| २. | २ ते ४ लाख | १३ | २०.०० | १४ | २०.९१ | ११ | १७.५० | ३८ | १९.६८ |
| ३. | ४ ते ६ लाख | १४ | २१.६७ | १६ | २४.५५ | १५ | २३.७५ | ४५ | २३.२३ |
| ४. | ६ ते ८ लाख | २७ | ४०.८३ | २६ | ४०.०० | ३० | ४६.२५ | ८२ | ४१.९४ |
| ५. | ८ लाखापेक्षा जास्त | ३ | ४.१७ | १ | १.८२ | २ | २.५० | ६ | २.९० |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ९ (१३.३३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांच्या स्थावर संपत्तीचे मूल्य २ लाख रुपयांपर्यंत आहे, १३ (२०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांच्या स्थावर संपत्तीचे मूल्य २ ते ४ लाख रुपये आहे, १४ (२१.६७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांच्या स्थावर संपत्तीचे मूल्य ४ ते ६ लाख रुपये आहे, तर, २७ (४०.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांच्या स्थावर संपत्तीचे मूल्य ६ ते ८ लाख रुपये आहे आणि ३ (४.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांच्या स्थावर संपत्तीचे मूल्य ८ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे.

### उत्पन्नाच्या स्रोतानुसार वर्गीकरण

उत्पन्नाचे स्रोत अनेक असतात. शेती, उद्योग, व्यापार, नोकरीतील पगार, बँकेचे व्याज, घरभाडे, शेतीचे भाडे, घरगुती व्यवसाय, स्वयंरोजगार इत्यादी. नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी देखील नोकरीशिवाय इतरही काम करून पैसे कमाऊ शकतात किंवा त्यांना इतर कुठले उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध असू शकतात. उत्पन्नाचे अनेक स्रोत उपलब्ध असतील तर आर्थिक विवंचना टळून

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 

व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम बनू शकते. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्याच्या उत्पन्नाच्या स्रोतांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाची ठरते. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे उत्पन्नाचे स्रोतानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ३**

**उत्पन्नाच्या स्रोतानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फक्त वेतन | १० | १५.८३ | १९ | २९.०९ | १५ | २३.७५ | ४४ | २२.५८ |
| २. | जोडधंदा | ३० | ४५.८३ | १६ | २४.५५ | ३२ | ४८.७५ | ७६ | ३९.०३ |
| ३. | शेती | १७ | २५.८३ | २७ | ४०.९१ | १४ | २१.२५ | ५९ | ३०.०० |
| ४. | घरभाडे | २ | २.५० | १ | १.८२ | २ | ३.७५ | ५ | २.५८ |
| ५. | इतर | ७ | १०.०० | २ | ३.६४ | २ | २.५० | ११ | ५.८१ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १० (१५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांना 'फक्त वेतन' हाच एक उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध आहे. तर, ३० (४५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांना वेतनासोबतच 'जोडधंदा' हा एक उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध आहे, १७ (२५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे उत्पन्नाचा 'शेती' हा एक आणखी स्रोत आहे. तर, २ (२.५०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांना 'घरभाडे' हा एक उत्पन्नाचा स्रोत आहे आणि ७ (१०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांना उत्पन्नाचे 'इतर स्रोत' उपलब्ध आहेत.

**अन्नधान्यावरील खर्चानुसार वर्गीकरण**

अन्नधान्य ही मानवाची एक मूलभूत गरज आहे. अन्नधान्यावरील खर्च हा मुख्य खर्च आहे. कुटुंबाच्या गरजेनुसार अन्नधान्यावर खर्च केला जातो. तथापि ज्या कर्मचाऱ्यांकडे शेती आहे त्यांना अन्नधान्यावर काही कमी प्रमाणात खर्च करावा लागतो. मिळविलेल्या उत्पन्नातून केला जाणारा हा एक महत्त्वाचा खर्च आहे. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा अन्नधान्यावरील खर्चाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR- 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 53

परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे अन्नधान्यावरील खर्चानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४**

**अन्नधान्यावरील खर्चानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १००० पर्यंत | १२ | १९.१७ | ११ | १६.३६ | ११ | १७.५० | ३५ | १७.७४ |
| २. | १ ते २ हजार | १६ | २४.१७ | १४ | २१.८२ | २२ | ३३.७५ | ५० | २५.८१ |
| ३. | २ ते ३ हजार | २८ | ४२.५० | २७ | ४१.८२ | २७ | ४१.२५ | ८२ | ४१.९४ |
| ४. | ३ ते ४ हजार | ७ | १०.८३ | १० | १५.४५ | २ | ३.७५ | २१ | १०.६५ |
| ५. | ४००० पेक्षा जास्त | २ | ३.३३ | ३ | ४.५५ | २ | ३.७५ | ८ | ३.८७ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १२ (१९.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा अन्नधान्यावरील खर्च हा १००० रुपयांपर्यंत आहे. तर, १६ (२४.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा अन्नधान्यावरील खर्च हा १ ते २ हजार रुपये आहे, २८ (४२.५०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा अन्नधान्यावरील खर्च २ ते ३ हजार रुपये आहे. तर, ७ (१०.८३%) प्रतिसादक कर्मचाज्यांचा अन्नधान्यावरील खर्च ३ ते ४ हजार रुपये आहे आणि २ (३.३३%) प्रतिसादक कर्मचाज्यांचा अन्नधान्यावरील खर्च हा ४ हजार रुपयांपेक्षा जास्त आहे.

**वैद्यकीय खर्चानुसार खर्चानुसार वर्गीकरण**

आजारी पडल्यानंतर वैद्यकीय उपचार आणि त्यासाठी खर्च ही न टाळता येणारी बाब आहे. आजारपण लहान असो वा मोठे प्रत्येक कुटुंबाला या आजारपणास सामोरे जावेच लागते. अल्पशा उत्पन्नगटातील कुटुंबे आपले आजारपण सरकारी मोफत दवाखान्यातून उपचार घेऊन दूर करू शकतात परंतु औषधपाण्यावर खर्च तर येतोच. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा वैद्यकीय खर्चानुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय खर्चानुसार वर्गीकरण अभ्यासले

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 54

आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ५**

**वैद्यकीय खर्चानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५०० पर्यंत | २० | ३०.८३ | १८ | २८.१८ | १९ | २८.७५ | ५७ | २९.३५ |
| २. | ५०० ते ७५० | ३१ | ४७.५० | ३७ | ५६.३६ | ८ | ५८.७५ | १०४ | ५३.५५ |
| ३. | ७५० ते १००० | १४ | २१.६७ | १० | १५.४५ | ८ | १२.५० | ३३ | १७.१० |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

**शिक्षणावरील खर्चानुसार वर्गीकरण**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांइतकीच मानवाची आणखी एक महत्त्वाची गरज आहे ती म्हणजे शिक्षण होय. विसाव्या शतकामध्ये शिक्षणचा मोठ्या प्रमाणावर प्रसार आणि प्रचार झाला. समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचण्यात शासनकर्त्यांना यश मिळाले आहे. सरकारी शाळांमधून मोफत शिक्षण दिले जाते. पुस्तके देखील मोफत दिली जातात. परंतु याशिवायही शिक्षणासाठी काही प्रमाणात खर्च होतोच.

**सारणी क्र. ६**

**शिक्षणावरील खर्चानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १००० पर्यंत | १२ | १८.३३ | ११ | १७.२७ | १० | १५.०० | ३३ | १७.१० |
| २. | १ ते २ हजार | १७ | २६.६७ | १८ | २८.१८ | १९ | २८.७५ | ५४ | २७.७४ |
| ३. | २ ते ३ हजार | २५ | ३८.३३ | २९ | ४४.५५ | २८ | ४३.७५ | ८२ | ४१.९४ |
| ४. | ३००० पेक्षा जास्त | ११ | १६.६७ | ७ | १०.०० | ८ | १२.५० | २६ | १३.२३ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019 

## सामाजिक कार्यक्रमावरील खर्चानुसार वर्गीकरण

बरेचवेळा सामाजिक कार्यासाठी खर्च करावा लागतो. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा सामाजिक कार्यक्रमावरील खर्चाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे सामाजिक कार्यक्रमावरील खर्चानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ७**

**सामाजिक कार्यक्रमावरील खर्चानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५०० पेक्षा कमी | १० | १५.८३ | ९ | १४.५५ | ७ | ११.२५ | २८ | १४.१९ |
| २. | ५०० ते ७५० | २५ | ३९.१७ | २५ | ३९.०९ | १४ | २१.२५ | ६९ | ३५.५२ |
| ३. | ७५० ते १००० | १२ | १९.१७ | १७ | २५.४५ | ३३ | ५१,२५ | ५८ | २९.६८ |
| ४. | १००० पेक्षा जास्त | १७ | २५.८३ | १४ | २०.९१ | ११ | १६.२५ | ४२ | २१.६१ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १० (१५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा सामाजिक कार्यक्रमावरील खर्च हा ५०० रुपयांपर्यंत आहे. तर, २५ (३९.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा सामाजिक कार्यक्रमावरील खर्च हा ५०० ते ७५० रुपये आहे, १२ (१९.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा सामाजिक कार्यक्रमावरील खर्च ७५० ते १००० रुपये आहे आणि १७ (२५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा सामाजिक कार्यक्रमावरील खर्च १००० रुपयांपेक्षा जास्त आहे.

## प्रवासावरील खर्चानुसार वर्गीकरण

प्रवासावरील खर्च हा देखील महत्त्वाचा खर्च आहे. नोकरीच्या ठिकाणाहून राहण्याचे ठिकाण लांब असेल किंवा दुसऱ्या गावी असेल तर प्रवासावर दररोज खर्च करावा लागतो. त्याशिवाय इतरही घरगुती किंवा वैयक्तिक कारणांसाठी प्रवासावर खर्च होतो. लग्नकार्य व इतर प्रसंगी देखील प्रवास करावा लागतो. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात

Issue : XVI, Vol. VI
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Doc. 2018 To May 2019


त्या कर्मचाऱ्यांचा प्रवासावरील खर्चाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रवासावरील खर्चानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ८**

**प्रवासावरील खर्चानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५०० पेक्षा कमी | ३ | ५.०० | ५ | ७.२७ | ४ | ६.२५ | १२ | ६.१३ |
| २. | ५०० ते ७५० | ७ | १०.८३ | ७ | १०.९१ | ११ | १७.५० | २५ | १२.५८ |
| ३. | ७५० ते १००० | १८ | २८.३३ | २० | ३०.०० | १९ | २८.७५ | ५७ | २९.०३ |
| ४. | १००० पेक्षा जास्त | ३६ | ५५.८३ | ३४ | ५१.८२ | ३१ | ४७.५० | १०२ | ५२.२६ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

## संदर्भ सूची :-


१) केप विल्यम एच. (१९६४), डिस्टींक्टीव्ही पर्सनल फिचर्स अमंग लोकल गव्हर्नमेंट, पर्सोनेल जर्नल, ४३:६ जून १९६४, पृ. ३०३-३०८.

२) भट्टाचार्य मोहित (१९६८), 'लोकल गव्हर्नमेंट सर्व्हिसेस इन इंडिया', इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन, सेंटर फॉर ट्रेनिंग अँड रिसर्च इन म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन, नवी दिल्ली, पृ. १३३-१४४.

३) बधे जी. एस. आणि राव एम. व्ही. (१९६९), 'म्युनिसिपल पर्सोनेल सिस्टीम', जरनल ऑफ द लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट (त्रैमासिक), ३९:४, पृ. ३१३ ते ३२२.

४) पटेल बी. पी. (१९६९), यांनी आपल्या 'निड फॉर ट्रेनिंग अँड ओरिएन्टेशन इन म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन', नागरलोक -१, पृ. ५ ते ८.

५) भट्ट एम. डी. (१९७०), 'नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची भूमिका' चिफ ऑफिसर्स ऑफ म्युनिसिपल काउन्सील्स : ए केस फॉर फॉरमेशन ऑफ स्टेटवाईज कॉमन कॅडर. द लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिट्युट, ४०:४, पृ. २७१ ते २८०.